REGISTERED No. B. 3434




# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ | पुणें, बुधवार तारीख १४ मे १९४७ | अंक २०

दी

## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

*( कोल्हापूर येथें संन १९२६ सालीं स्थापन झालेली व भागीदारांची मर्यादित जबाबदारी असलेली.)*

एच. एच. दी छत्रपति महाराजासाहेब ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,०६,५०० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. | ५,०६,५०० |
| भरलेलें | रु. | २,५३,००० |
| रिझर्व्ह | रु. | ४,०५,००० |

एकूण खेळतें भांडवल रु. १,००,००,००० हून अधिक

**मुख्य कचेरी**—बँक ऑफ कोल्हापूर बिल्डिंग, लक्ष्मीपुरी–कोल्हापूर.

**शाखा : संस्थानांतील**:—(१) शाहुपुरी–कोल्हापूर, (२) गुजरी–कोल्हापूर, (३) जयसिंगपूर, (४) इचलकरंजी, (५) पेठ–वडगांव, (६) मलकापूर, (७) गडहिंग्लज. **संस्थानाबाहेरील**:—(८) मुंबई, (९) निपाणी (जि. बेळगांव)

★ चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

★ योग्य तारणावर कर्जें, ओव्हरड्रॉफ्टस व कॅश क्रेडिटस दिलीं जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

★ मौल्यवान चीजवस्तु सुरक्षित ठेवणेसाठीं हेड ऑफिसमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची उत्तम व्यवस्था.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

व्ही. ए. सावंत, अॅ. मॅनेजर

## दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

स्थापना सन १९२७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | २,००,००० दोन लक्ष | रुपये |
| भरलेलें भांडवल | ७१,२२० | रुपये |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,००,००० चे वर | रुपये |
| खेळतें भांडवल | ९,००,००० | रुपये |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासद, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागिदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर ३ टक्के व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. चेक–हुंड्यांची खरेदीविक्री, रेल्वे रसीदची वसुली वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

—अधिक माहितीकरितां भेटा अगर लिहा—

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर










-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

# विविध माहिती

**सेंट्रल पे कमिशनचा अहवाल**—ऑलइंडिआ रेल्वेमन्स फेडरेशनचे सेक्टरी श्री. गुरुस्वामी यांना मध्यवर्ती सरकारचे अर्थमंत्री मि. लिआकतअली खान यांनीं धाडलेल्या तारेवरून, सेंट्रल पे कमिशनचा अहवाल ता.२० मे रोजीं प्रसिद्ध करण्यांत येणार आहे असें समजतें.

**अमेरिकेची धान्य निर्यात**—गेल्या महिन्यांत अमेरिकेंतून धान्य व धान्यापासून बनविलेल्या वस्तू मिळून १५ लक्ष टन खाद्य पदार्थ गरजू राष्ट्रांकडे निर्यात करण्यांत आले असें अमेरिकेच्या शेतकी खात्यानें जाहीर केलें आहे. हा आकडा धरून १९४६ सालीं झालेल्या निर्यातीचा आकडा १ कोटी, ९ लाख, ७३ हजार टन इतका होतो.

**इंडोनेशिआंतून तांदूळ येणार**—या वर्षी इंडोनेशिआनें हिंदुस्थानाला १ लाख टन तांदूळ निर्यात करण्याचें कबूल केलें आहे अशी माहिती श्री. के. एल. पंजाबी यांनीं नुकतीच जाहीर केली. मध्य हिंदुस्थानासाठी सिंधमधील २५ हजार टन गहू लवकर मिळावा म्हणून खटपट करण्यासाठी श्री. पंजाबी कराचीला गेले होते, तेव्हां त्यांनीं वरील माहिती सांगितली.

**पनामा कालव्याचें संरक्षण**—पनामा कालव्याचें संरक्षण करण्यासाठी एका नवीना कराराचा मसुदा अमेरिकेनें पनामा लोकसत्ताक सरकारला सादर केला आहे. या कराराच्या मसुद्यान्वयें पनामाच्या लोकसत्ताक राज्यांतील लष्करी विमान तळ लष्करी उपयोगाठी वापरण्याची सवलत अमेरिकेला मिळणार आहे.

**इजिप्तची अमेरिकेकडे कर्जाची मागणी**—इजिप्तनें अमेरिकेला ८ कोटी,८० लाख डॉलर्सचें कर्ज देण्याची विनंति केली आहे असें इजिप्तच्या अर्थमंत्र्यांनीं जाहीर केलें आहे. इजिप्तमधील चलनी नोटांना २५ टक्के सोन्याचें तारण असणें आवश्यक असल्यानें हें कर्ज मागण्यांत येत असल्याचा खुलासा त्यांनीं केला.

**सोव्हिएट रशिआचे नवें कर्ज**—युद्धामुळें झालेली नुकसानी भरून काढण्यासाठी सोव्हिएट सरकारनें एक नवें कर्ज काढण्याचें ठरविलें आहे. हें कर्ज २ सर्व रूबल्सचें उभारण्यांत येणार असून दर वर्षी दोनदां लॉटरीचीं तिकिटें काढून २० वर्षांत परत करण्यांत येणार आहे. या दोन लॉटरींत ५० हजार रूबल्स पासून २० रुबल्स पर्यंत अनेक बक्षिसें ठेवण्यांत येणार आहेत.

**स्टॅलिन यांची सहकार्याची विनंती**—पुढील वर्षी होणाऱ्या अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठीं मि. हॅरोल्ड स्टॅसेन हे रिपब्लिकन उमेदवार उभे रहाणार आहेत. मास्को येथें त्यांची व एम. स्टॅलिन यांची मुलाखत ता. ९ एप्रिल रोजीं झाली. रशिआ आणि अमेरिका यापैकीं कोणीही सहकार्याची इच्छा दर्शविली नाहीं तर त्याचा परिणाम युद्धांत झाल्यासेरीज रहाणार नाहीं असें मत एम्. स्टॅलिन यांनीं व्यक्त केलें.

**सुपारी चैनीची वस्तु नव्हे, जरूरीची**—अलाहाबाद म्युनिसिपल बोर्डांत नवे कर बसविण्यासंबंधीं विचारविनिमय चालू असता सुपारी चैनीची वस्तु आहे कीं आवश्यक गरजेची, असा वाद उत्पन्न झाला. अखेर अध्यक्षांनीं पान व सुपारी हा जीवनावश्यक वस्तू आहेत असा आपला निर्णय दिला.

**हिंदुस्थानला अधिक टिन मिळणार**—गेल्या महिन्यांत ब्रुसेल्स येथें आंतरराष्ट्रीय टिन परिषद भरली होती. टिन कमिटीच्या अध्यक्षांशीं व इतर सभासदांशीं हिंदी प्रतिनिधींचा व्यक्तिशः परिचय झाल्यामुळें हिंदुस्थानला हल्लींपेक्षां अधिक टिनचा वांटा मिळेल असा अंदाज करण्यांत येत आहे.

**बंगाल विधिमंडळाचा बुरखेवाला अध्यक्ष**—मिसेस एच्. ए. हाकम या बंगाल विधिमंडळाच्या सभासद गोषा घेऊनच विधिमंडळाच्या अध्यक्षस्थानावर आरूढ झाल्या होत्या. त्या प्रसिद्ध शिक्षण शास्त्रज्ञ असून विधिमंडळानें निवडलेल्या अध्यक्ष मंडळावर त्यांची निवड झाली होती.

**बाटांना १५ वर्षांची सक्तमजुरी**—जगांतील बुटांचे सुप्रसिद्ध कारखानदार मि. यॅन बाटा यांना प्रागमधील झेक कोर्टानें १५ वर्षे सक्तमजुरी, नागरिकत्वाच्या हक्कांचे हरण आणि मालमत्तेची जप्ती अशी शिक्षा दिली. जर्मनीनें झेकोस्लोव्हाकिआ व्यापल्यावर त्यांनीं जर्मन सरकारशीं सहकार्य केलें असा त्यांच्यावर आरोप होता. मि. बाटा हल्लीं ब्राझिलमध्यें असून त्यांच्या गैरहजेरींतच वरील शिक्षा सुनावण्यांत आली.

**हिंदुस्थानांत जपानी कापड व सूत**—जपानमधील मुख्य लष्कराधिकाऱ्यानें हिंदुस्थानला जपानकडून ८ कोटी वार कापड व ८० लाख पौंड सूत विकत घेतां येईल असें जाहीर केलें आहे. युद्ध संपल्यानंतर जपानकडून येणाऱ्या मालाचा हा पहिलाच हप्ता असून येत्या जून तें जुलै अखेर हा मालाच्या बोटी नेण्यांत याव्या असें ठरविण्यांत आलें आहे.

**संरक्षण मागणाऱ्या धंद्यांना सरकारचा इषारा**—ज्या उद्योगधंद्यांनीं आतापर्यंत सरकारी मदतीची अगर संरक्षक जकातीची मागणी केलेली नाहीं, त्यांना ती करावयाची असल्यास जुलै १९४७अखेरपर्यंतच करता येईल, असें मध्यवर्ती सरकारच्या व्यापार खात्यातर्फे जाहीर करण्यांत आलें आहे. सध्या कित्येक परदेशी वस्तूंच्या आयातीला बंदी करण्यांत आली आहे, अगर त्यांच्या आयातीला मर्यादा घालण्यांत आल्या आहेत. या वस्तूंच्या आयातीवर अवलंबून असलेल्या कांहीं महत्वाच्या उद्योगधंद्यांची त्यामुळें कुचंबणा होत आहे. किरकोळ उद्योगधंद्यांना संरक्षण देतांना महत्वाचे उद्योगधंदे मारले जाऊं नयेत या हेतूने जुलै १९४७ नंतर या वस्तूंच्या आयातीला परवानगी देण्याचा सरकारचा विचार आहे.

**कलकत्त्याला नवें महत्त्व येणार**—हिंदुस्थान सरकारचे व्यापार मंत्री मि. चुंद्रीगर यांच्या अध्यक्षतेखाली, हिंदुस्थानांतील चहाच्या व्यापाराशीं संबंधित असलेल्यांची एक सभा नुकतीच दिल्ली येथें भरली होती. सभेंत, कलकत्त्याला चहाच्या व्यापाराचें प्रमुख केंद्र बनविण्याचा निर्धार व्यापारमंत्र्यांनीं बोलून दाखविला. यासाठी चहाचा साठा करण्याची व गुदामे बांधण्याची योजना आखण्यांत येणार आहे. युद्धापूर्वी हिंदुस्थानांतील चहाचे लिलांव लंडनमध्यें होत असत. नवीन योजनेप्रमाणें सर्व नाहीं तरी बरेच लिलांव हिंदुस्थानांतच करण्यांत येणार आहेत.

**अमेरिकेंतून गव्हाची आयात**—अमेरिकेंतून ८,८६४ टन गहूं घेऊन एक बोट नुकतीच मुंबईला आली. यापैकीं २ हजार टन गहू कराचीला पाठविण्यांत येणार असून बाकीच्याची वाटणी पुढीलप्रमाणें होणार आहे. मुंबई २,२६४ टन; हैद्राबाद ३०० टन; बडोदं २०० टन; ग्वाल्हेर ५०० टन; मध्य हिंदुस्थानांतील संस्थानें १,४०० टन; लष्कर २,००० टन.

**इंग्लंडच्या जनतेची उपासमार**—लंडनमधील एक प्रसिद्ध डॉक्टर व आहारविषयक तज्ञ डॉ. विकनेल यांनीं इंग्लंडमधील जनतेची उपासमार होत असल्याचें आपलें मत प्रसिद्ध केलें आहे. कमी काम केल्यामुळें अन्नाचें उतरतें उत्पादन आणि अन्नाच्या घटत्या उत्पादनामुळें कमी काम, या चक्रव्यूहांतून मार्ग काढला नाहीं तर इंग्लंड राष्ट्र या नात्यानें निष्प्राण होईल, असें त्यांचें मत आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १४ मे, १९४७

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.




मा. वा. मो. काळे

## जिनीव्हा येथील आंतरराष्ट्रीय व्यापार परिषद्

आधुनिक जगांतील सर्वच देश आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीनें एकमेकास जोडलेले आहेत. वस्तुस्थिति अशी असली तरी निरनिराळ्या देशांतील राष्ट्रीय सरकारें आपला व्यापार वाढविण्याच्या दृष्टीनेंच आयात-निर्यातींवरील जकातीचें धोरण ठरवीत असतात. १९२९ ते ३२–३३ पर्यंत जागतिक व्यापारांत आलेली मंदीची ओहोटी जगांतील प्रमुख राष्ट्रांनीं आयातीवरील संरक्षक जकाती भरमसाठ वाढविल्यामुळेंच आली, असें मत बऱ्याच अर्थशास्त्रज्ञांनीं व्यक्त केलेलें आहे. या मताचा खरेखोटेपणा अजमावणें कठिण असलें तरी दुसऱ्या महायुद्धानंतरच्या आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधींच्या विचारांवर या मताचा थोडाफार परिणाम झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

जिनीव्हा येथें आंतरराष्ट्रीय व्यापार परिषदेच्या प्राथमिक समितीचें दुसरें अधिवेशन ता. १० एप्रिल पासून सुरू झालें असून लंडनमधील पहिल्या अधिवेशनाचेंच कामकाज परिषदेंत पुढें चालविण्यांत येत आहे. आंतरराष्ट्रिय व्यापार संकुचित करणाऱ्या जकाती अजिबात नाहींशा करणें आजच शक्य होणार नाहीं याची जाणीव बहुतेक सर्व प्रतिनिधींनीं या ना त्या मार्गानें व्यक्त केलेली आहे. तथापि संरक्षक जकाती कमी करण्याच्या बाबतींत मात्र बरेच अडचणींचे प्रश्न उत्पन्न झाले आहेत. आंतरराष्ट्रीय व्यापाराची सर्वमान्य सनद आधी तयार करून मग संरक्षक जकाती कमी कराव्या कां जकाती कमी केल्यानंतर येणाऱ्या अनुभवानुसार सनद तयार करावी याबद्दलच मुळांत मतभेद आहेत. अमेरिकेचें उत्पादन सामर्थ्य जगांत पहिल्या प्रतीचें; त्यामुळें अमेरिका सर्वमान्य सनदेच्या चौकटींत इतर राष्ट्रांचें व्यापारी धोरण बसविण्यास उत्सुक आहे. याच्या उलट विचारसरणी ब्रिटिश प्रतिनिधी मंडळानें व्यक्त केली. हा वादाचा मुद्दा आज तात्त्विक दिसत असला तरी त्याच्या निकालावर आंतरराष्ट्रीय व्यापाराची दिशा व ओघ अवलंबून आहेत हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत आज महत्त्व पावलेला मुद्दा कांहीं राष्ट्रांना जकातीसंबंधीं सवलती देण्यासंबंधीचा आहे. जिनीव्हा परिषदेंत ब्रिटनच्या व फ्रान्सच्या प्रतिनिधींनीं इंपीरिअल प्रेफरन्स चालू ठेवण्यासंबंधी आग्रह धरला आहे आणि या आग्रहाला सर स्टॅफर्ड क्रिप्स सारख्या ब्रिटिश मंत्र्यानें पाठिंबाहि दिलेला आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार परिषदेंत सोव्हिएट रशिआनें भाग घेण्याचें ठरविल्यामुळें आणखी नवीनच परिस्थिति उद्भवली आहे.

कमी-अधिक प्रमाणांत उद्योगप्रधान असलेल्या राष्ट्रांच्या या परिषदेंत हिंदुस्थानसारख्या मागासलेल्या देशाची स्थिति आधींच चमत्कारिक होते. त्यांतून डॉ. डाल्टन यांनीं स्टर्लिंग कर्जाबद्दल केलेल्या घोषणेमुळें तर परिस्थिति नुसती चमत्कारिकच नव्हे तर नाजूक झाली आहे. अमेरिका आणि हिंदुस्थान या दोन देशांत १९४६ मध्यें झालेल्या आयात-निर्यातीचा विचार केला तर हिंदुस्थानचे प्रतिनिधी प्रमुख मि. चुंद्रीगर यांच्या पुढील अडचणीची कल्पना करता येईल. हिंदुस्थानांतून अमेरिकेंत १९४६ सालीं २३ कोटी, ७६ लाख, ६५ हजार डॉलर्स किंमतीचा माल निर्यात झाला. उलट अमेरिकेनें हिंदुस्थानांत १७ कोटी, ७ लाख, २९ हजार डॉलर्स किंमतीचा माल पाठविला. हिंदुस्थानची निर्यात अशा रीतीनें आयाती पेक्षा अधिक असली तरी हिंदुस्थानांतून ताग, काजूच्या बिया, चहा, लाख, कापूस, लोकर, अभ्रक, कॉटन वेस्ट व मँगेनीजसारखा कच्चा माल जातो आणि आयात मात्र पक्क्या मालाची होते. यावरून हिंदी उद्योगधंद्यांचें व पर्यायानें हिंदी अर्थव्यवस्थेचें दुखणें जुनेंच आहे असें दिसून येतें. अशा परिस्थितींत जिनीव्हा येथील हिंदी प्रतिनिधींच्या कार्याकडे हिंदी राष्ट्राचे डोळे लागून रहाणें साहजिकच आहे.

## कर्जाची फेड करण्यांत ब्रिटनची टाळाटाळ

ब्रिटिश सरकारचे फडणवीस, डॉ. डाल्टन ह्यांनीं गेल्या आठवड्यांत लंडनमध्यें आपल्या एका भाषणांत, ब्रिटनचें युद्धकालांत निर्माण झालेलें देणें अगदीं अल्प रकमेवर तोडण्यांत आलें पाहिजे, असें अगदीं उघडपणें सुचविलें. भरमसाठ कर्जे शिरावर घेण्याचें ब्रिटननें नाकारलें पाहिजे असें ते म्हणाले. मजूर मंत्रिमंडळाशीं हुजूर पक्षाचा कितीहि विरोध असला तरी परदेशांचें देणें काटण्याचे बाबतींत सर्वांचें एकमत आहे. मि. चर्चिल ह्यांनीं डॉ. डाल्टन ह्यांच्या उपक्रमास हार्दिक पाठिंबा दिला आहे. कालांतरानें देणें नाकारण्यापेक्षा वेळीच, सर्व गोष्टी ताज्या असतांना, आपली कर्ज फेडण्याची अशक्यता स्पष्ट बोलून दाखविणें चांगलें, अशी मल्लीनाथी 'फिनॅन्शिअल टाइम्सनें' केली आहे. हिंदुस्थानाचें इंग्लंडमधील साचलेलें सबंद येणें देण्यास ब्रिटननें नकार दिला व स्वतःच्याच मताचा हट्ट धरला, तर त्यानें उपकाराची फेड अपकारानें केली, असेंच कोणीहि म्हणेल. "उदारपणानें दिलेलीं हीं कर्जे उपकारपूर्वक फेडलीं जातील," हे लॉर्ड केन्स ह्यांचे उद्गार ब्रिटन विसरला तरी हिंदुस्थान विसरणें शक्य नाहीं. हिंदी येणें छाटण्यासाठी पुढें मांडण्यांत आलेले सर्व ब्रिटिश मुद्दे कसे फोल आहेत, हें रिझर्व्ह बँकेचे आर्थिक सल्लागार श्री. जे. व्ही. जोशी, ओ. बी. ई., ह्यांनीं पुणें येथील आपल्या जाहीर भाषणांत गेल्या जुलैमध्यें विशद करून सांगितलें होतें. हिंदुस्थान प्रभृति देशांचें देणें तोडण्याचे बाबतींत ब्रिटनची वृत्ति दुर्दैवानें अधिकाधिक कणखर होत चालली आहे. जरी ही छाटाछाट धनको देशांनीं आज मान्य केली, तरी उरलेल्या कर्जाची परतफेड त्यांस कशी होणार हा महत्त्वाचा प्रश्न रहातोच; कारण धनको देशांना तातडीनें क्रयसाधन उपलब्ध करून देण्याचे शक्य तोंवर पुढें ढकलण्याचा ब्रिटनचा प्रयत्न आहे. ब्रिटिश सरकारची व ब्रिटिश नागरिकांची हिंदुस्थानांत अब्जावधि रुपयांची मालमत्ता आहे. ती हिंदुस्थानांत विकून टाकून त्याची किंमत ब्रिटिश पौंडांत देऊन टाकावी; तोपर्यंत हिंदुस्थानाच्या ब्रिटनमधील येण्यास काट बसण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं, असा युक्तिवाद हिंदुस्थानातर्फे करण्यांत येत आहे.

## स्फुट विचार

### शास्त्रीय संशोधन आणि शेती

शास्त्रीय संशोधन म्हटलें कीं, शांतताकालीं तरी उद्योगधंद्याशीं निगडित अशा प्रकारचें संशोधन असा अर्थ न कळत रूढ झालेला आहे. ही परिस्थिति रशिआ सोडून सर्वच उद्योगप्रधान राष्ट्रांत दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वी दिसून येत असे. युद्धकालीं पडलेल्या अन्नाच्या तुटवड्यामुळें ब्रिटनला या बाबतींत आपलें परावलंबित्व पुन्हां एकदा तीव्रतेनें लक्षांत आलें. आतां ब्रिटनमध्येंहि शेतीच्या प्रश्नांचा विचार होऊं लागला आहे. तथापि ब्रिटनमध्यें हवामान व पीकपाणी यांची विविधता नसल्यानें तेथील प्रश्न फारसे गुंतागुंतीचे नाहींत. रशिआंत हवामानाची विविधता अधिक, त्यामुळें शेतीविषयक प्रश्नही निरनिराळें स्वरूप धारण करतात. चहाच्या उत्पादनांत रशिअन शास्त्रज्ञांनीं एक नवा शोध लावल्याची बातमी आहे. जॉर्जिया या राज्यांत चहाचे दोन नवीन प्रकार शोधून काढण्यांत आले आहेत. या चहाचें उत्पादन चीनमधील चहाच्या दुप्पट होतें. कूबन नदीच्या खोऱ्यांतही एका विशिष्ट प्रकारच्या चहाची लागवड करण्यांत येत आहे. त्या चहाचें वैशिष्ट असें कीं तो, उष्णतामापक यंत्र ५४ डिग्री इतकी थंडी दाखवीत असताही त्या थंडीला दाद न देतां वाढूं शकतो. मध्य आशियांतील चहाच्या मळ्यांतून चहाच्या झाडांच्या रांगांतून एका विशिष्ट प्रकारच्या मक्याची लागवड करण्यांत येते. या प्रकारच्या पेरणीमुळें चहाच्या झाडांचें सूर्याच्या प्रखर उन्हापासून संरक्षण होते. मास्कोच्या आसपासही नव्या प्रकारचा चहा शोधून काढण्यासाठी प्रयोग चालू आहेत. हिमप्रदेशांतही पिकणारा गहूं शोधून रशिअन शास्त्रज्ञांनीं केलेली क्रांति प्रसिद्धच आहे.

---

### खेडेगांवांतील पाणीपुरवठा

मुंबई सरकारनें १९४७–४८ सालच्या अंदाज–पत्रकांत खेडेगांवांतील पाणीपुरवठ्यासाठी म्हणून सुमारें २० लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. जनहिताच्या आपल्या कार्यक्रमांत पिण्याच्या पाण्याची सोय करण्याला अग्रस्थान देण्याचें सरकारनें आतां निश्चित ठरविलें असून २०० किंवा त्याहून अधिक लोकसंख्या असणाऱ्या गांवांना विहिरी खोदून अगर इतर मार्गानें पिण्याचें पाणी मिळण्याची सोय करण्यांत यावयाची आहे. जीं गांवें विनावेतन श्रम अगर वाहतुकीच्या गाड्या अगर वर्गणी देतील त्यांना याबाबतची सरकारी मदत आधीं मिळणार आहे; इतरांना मिळणार नाहीं असें मात्र नाहीं. सार्वजनिक सोयीच्या पाठवड्यासारख्या स्थानावर इतर नागरिकांप्रमाणेंच हरिजनांनाही हक्क देण्यांत आले असून त्याबाबत योग्य त्या सरकारी अधिकाऱ्यांना हुकूमही देण्यांत आले आहेत. एकाद्या ठिकाणीं हरिजनांचे अधिकार त्यांना सुरळीत उपभोगावयास मिळणार नाहींत असें वाटल्यास कलेक्टराला अशी सरकारी मदत फक्त हरिजनांसाठींच उपयोगांत आणतां येईल अशी व्यवस्था केलेली आहे. खेड्यांतील पाणी-पुरवठा यापुढें आरोग्य व स्थानिक–स्वराज्य खातें आणि पब्लिक वर्क्स खात्याचा मुख्य इंजिनिअर यांच्या असत्यारांत रहाणार आहे. दर वर्षी जुलै महिन्यांत कलेक्टरनें मंजूर केलेल्या योजनांची पुढील वर्षाची यादी तयार करावयाची आहे. ही यादी तयार करतांना कलेक्टरनें एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष व जिल्हा रूरल डेव्हलपमेंट बोर्डाचे अध्यक्ष यांचा सल्ला घ्यावयाचा आहे.

---

### १९४६ च्या शेवटच्या तिमाहींतील भांडवल उभारणी

भांडवल उभारणीवरील नियंत्रणांच्या मध्यवर्ती सरकारच्या योजनेनुसार आक्टोबर १९४६ ते डिसेंबर १९४६ अखेर पर्यंत १५७ कंपन्यांना मिळून सुमारें ५८ कोटी रुपयांवर भांडवल उभारणीस परवानगी देण्यांत आली. या कालखंडांत २०० कंपन्यांकडून सुमारें ७१ कोटी रुपये भांडवल उभारण्याची परवानगी मागण्यांत आली होती. त्यापैकीं ४३ कंपन्यांस मिळून १२ कोटी रुपयांच्या उभारणीस परवानगी नाकारण्यांत आली. परवानगी देण्यांत आलेल्या ५८ कोटी रुपयांच्या भांडवलापैकीं ३० कोटी रुपयांची उभारणी औद्योगिक कारखान्यांना देण्यांत आली. यापैकीं २१ कारखाने दूरगामी योजनांच्या स्वरूपाचे आहेत. बिगर औद्योगिक कंपन्यांना दिलेली परवानगी सुमारे २८ कोटी रुपयांची होती. औद्योगिक कारखान्यांना नाकारण्यांत आलेली भांडवल उभारणी सुमारे ३ कोटी, ५० लाखांच्या घरांत जाते. बिगर औद्योगिक कंपन्यांबाबत हा आंकडा ८ कोटींपेक्षां कमी आहे. या ८ कोटींत नकार देण्यांत आलेल्या कंपन्या म्हटल्या म्हणजे मुख्यत: बँका आणि व्यापारी कंपन्या होत. नजीकच्या काळांत उभारले जाणारे कारखाने व कांहींशा दीर्घ कालानंतर उभारले जाणारे कारखाने असा भेद लक्षांत घेतला तर भांडवलाच्या उभारणीचें प्रमाण अनुक्रमें २३ कोटी रुपये आणि ३५ कोटी, ४४ लाख रुपये असें पडतें. वरील भांडवल उभारणींत हिंदी संस्थानांचा वाटा ५ कोटी, ५४ लाख रुपये असून परवानगी १५ कंपन्यांना देण्यांत आली. संस्थानांतील अर्जांपैकीं ५ कंपन्यांना मिळून ८५ लाख रुपयांची परवानगी नाकारण्यांत आली.

---

### ऑल इंडिआ को. फायर अँड जनरल इन्शुरन्स सोसायटी, लि.

१९४४ सालीं नोव्हेंबर महिन्यांत मुंबई येथें १८ वी प्रांतिक सहकारी परिषद सर टी. विजयराघवाचारिअर यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. या परिषदेंत एक ठराव मंजूर होऊन एक को. फायर व जनरल इन्शुरन्स सोसायटी काढण्याची शक्यता अजमावण्यासाठी कमिटी नेमण्यांत आली होती. या कमिटीनें सांगोपांग विचार करून अशा तऱ्हेची सोसायटी काढण्याची वेळ आतां आली आहे असें मत व्यक्त केलें होतें. या कमिटीचा अहवाल मुंबई प्रांतिक को. इन्स्टिटयूटच्या कार्यकारी मंडळापुढें ठेवण्यांत आला होता. आतां कार्यकारी मंडळानें नेमलेल्या सब-कमिटीनें मिळालेल्या आदेशानुसार सोसायटीचे पोटनियम तयार केले आहेत. या पोटनियमाप्रमाणें सोसायटीचें भांडवल १० लाख रुपयाचें ठरविण्यांत आलें असून ते १०० रुपयांच्या १० हजार सामान्य भागांत विभागण्यांत आलें आहे. पैकीं २½ लाख रुपयांचें भांडवल खपल्यावर व वसूल झाल्यावर कामास प्रारंभ करण्याचें ठरलें आहे. सोसायटीच्या सभासदांचे तीन वर्ग करण्यांत आले आहेत. (१) १० भाग धारण करणारी कोणतीही को. सोसायटी, (२) सोसायटी रजिस्टर करण्याच्या अर्जावर सह्या करणाऱ्या व्यक्ती आणि (३) सोसायटीचे भाग धारण करणाऱ्या व्यक्ती. सहकारी सोसायट्यांच्या नफ्यांत ग्राहकांना हिस्सा देण्याच्या सहकारी तत्त्वाप्रमाणें नफ्यापैकीं जास्तीत जास्त ५० टक्के रकम विमेदारांत वाटण्याचें ठरविण्यांत आलेलें आहे. ऑल इंडिआ को. प्लॅनिंग कमिटीच्या शिफारसी डोळ्यापुढें ठेवून सोसायटीच्या बोर्डावर १५ संचालकांची निवड करण्यांत येणार आहे. जास्तीत जास्त ५ सभासद व्यक्तिश: सभासद निवडतील; १०० सभासदांना एक संचालक या प्रमाणांत ही निवडणूक होईल.

## नव्या भांडवल उभारणीस परवानगी

| कंपनी | धंदा | मान्यता दिलेलें भांडवल ( रु. ) | शेरा |
|---|---|---|---|
| लुधिआना वनस्पति मिल्स लि. लुधिआना | तेल गाळणें व शुद्ध करणें | १०,००,००० | नवी कंपनी |
| केमिकल इंडस्टिअल अँड फार्मास्यूटिकल लॅबो-रेटरिज लि. मुंबई | रसायनें आणि औषधें | ९,००,००० | जु. कं. चें नवीन भांडवल |
| श्री. आर. इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट, लि. लखनौ | स्टॉक्स शेअर्स डिबेंचर्स इत्यादींत पैसे गुंतविणें | ५,००,००,००० | नवी कंपनी |
| श्री. आर. फिनॅन्स कॉर्पोरेशन लि. लखनौ | भांडवल पुरविणारी कंपनी | ५,००,००,००० | नवी कंपनी |
| साधना टेक्स्टाइल मिल्स लि. मुंबई | रेयॉन आणि रेशीम कारखाना | २०,००,००० | नवी कंपनी |
| युनायटेड ग्लास वर्क्स लि. मदुरा | शीट ग्लासचा कारखाना | २०,००,००० | नवी कंपनी |
| युनायटेड जर्नल्स लि. अलाहाबाद | इंग्लिश व उर्दू दैनिक | १०,००,००० | नवी कंपनी |
| यूकेन फार्मास्यूटिकल अँड केमिकल वर्क्स लि. मुंबई | औषधें व रसायनें | १५,००,००० | नवी कंपनी |

### परदेशांतील उत्पन्नावर प्राप्तीचा कर

हिंदुस्थानांतील रहिवाशी नागरिकाच्या परदेशांतील प्राप्तीवर उत्पन्नाचा कर बसविता येतो कीं नाहीं यासंबंधी एक महत्त्वाचा निवाडा मुंबई हायकोर्टानें नुकताच दिला. बाई शीरीन बाई दादी यांना १९३८–३९ सालीं हॉंगकॉंग येथील त्यांच्या मालमत्तेपासून सुमारे ६५ हजार डॉलर्सचे उत्पन्न मिळालें होतें. उत्पन्नावरील कराच्या कायद्याच्या चौथ्या कलमानुसार या उत्पन्नावर कराची आकारणी करण्यांत आली. त्याचबरोबर पोटकलम एक खाली त्यांना ४५०० रु. येवढी कराची रकमेची सूट देण्यांत आली. १९३९–४० सालांतही वरील प्रमाणेच आकारणी व ४५०० रु. ची सूट देण्यांत आली. त्यानंतर १९४०–४१ सालीं या बाईनें अडीच लाखावर डॉलर्स हिंदुस्थानांत आणले. त्यांत सूट दिलेली ९००० रु. ची रकम होती. कर बसविणाऱ्या अधिकाऱ्यांचें म्हणणें असें कीं या ९००० रु. च्या रकमेवर कर घेण्याचा अधिकार खात्याला आहे. उलट बाईचें म्हणणें असें, कीं या रकमेची सूट मिळालेली असल्यामुळें त्यावर आतां कर घेतां येणार नाहीं. यावर कोर्टानें निर्णय दिला कीं हिंदी नागरिकांच्या परदेशीय उत्पन्नावर कर वसूल करतां येण्यापूर्वी सदर उत्पन्न हिंदुस्थानांत आणलेलें असलें पाहिजे. तसें तें आणलेलें नसल्यास कर वसूल करतां येणार नाहीं. कराची आकारणी आणि वसुली या दोन स्वतंत्र बाबी आहेत. वरील ९ हजारांच्या रकमेवर मुळांतच आकारणी करण्यांत आलेली नव्हती अर्थात् त्यावर कर वसूल करण्याचा प्रश्नच उद्भवला नाही परंतु बाईनीं हे ९००० रु. हिंदुस्थानांत आणले असल्यामुळें त्यावर कर आकारून तो वसूल करण्याचा अधिकार प्राप्तीवरील कराच्या खात्याला पोंचतो.

### चहा

चहाची निर्गत मुख्यतः हिंदुस्थान, सिलोन व ब्रिटिश आफ्रिका ह्यांतून होते. चीन, नेदरलंड ईस्ट इंडीज, जपान, फोर्मोसा, इंडो-चायना, मलाया, इत्यादि देशांतूनहि मोठ्या प्रमाणावर चहा निर्गत होत असे. परंतु युद्धामुळें तेथील उत्पादन व पुरवठा ह्यांवर आतां अतिशय प्रतिकूल परिणाम झालेला आहे. मागणी आणि पुरवठा ह्यांत प्रमाणबद्धता राखण्यासाठी निर्गतीवर नियंत्रण बसविणें आवश्यक वाटल्यावरून हिंदुस्थान, सिलोन व ने. ईस्ट इंडीज ह्यांनीं १९३३ सालीं एक करार केला. त्यावर पुढें केनिया, युगांडा, टांगानिका व न्यासालँड ह्यांनींहि सह्या केल्या. हा करार मार्च १९४८ अखेर अमलांत राहाणार आहे. प्रस्तुत करारानें ह्या सर्व देशांच्या चहाच्या निर्गतीचें प्रमाण ठरवून दिलें आहे. आतां चहाची लागवड सर्वच देशांत फार झपाट्यानें वाढत आहे.

१८८९ मध्यें प्रत्येक इंग्रजानें सरासरीनें ५ पौंड चहा घेतला; १९१४ मधील दरमाणशी उठाव ८·६४ पौंड झाला आणि १९३९ मध्यें तो ९·५ पौंडावर गेला. त्या वर्षी ग्रेट ब्रिटनमध्यें ४३ कोटि. ५ लक्ष पौंड खपला. त्यामानानें अमेरिकेंतील ८ कोटि, ५ लक्ष पौंडांचा उठाव कांहीच नाहीं. कलकत्ता व कोलंबो येथील चहाच्या लिलावांत पूर्वीइतकी चढीची किंमत मळेवाल्यांस आतां येत नाहीं.

### दि कमर्शिअल बँक लि., कोल्हापूर

१½ लक्ष रुपयांचें वसूल भांडवल, ९२ हजारांचे रिझर्व्हज व इतर फंड, ३३ लाखांच्या ठेवी, वगैरे बाबी भांडवल व देणें बाजूस वरील बँकेच्या ताज्या ताळेबंदांत दिसतात. बँकेनें ९½ लक्ष रु. रोख व बँकांत ठेवले असून ५½ लक्ष रुपयांचीं बिलें डिस्कौंट केलीं आहेत. रोख्यांत ८८ हजार गुंतवले असून २१½ लाखांचीं कर्जें दिलेलीं आहेत. १९४६ सालीं बँकेस २५ हजार रु. निवळ नफा झाला. भागीदारांना द. सा. द. शे. ८ रु. २ आ. करमाफ डिव्हिडंड व १ रु. १४ आ. बोनस मिळणार आहे. प्रिन्सिपॉल एस. जी. दाभोळकर हे बँकेचे चेअरमन असून श्री. गणपतराव लक्ष्मणराव साळोखे हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. बँकेची वार्षिक सभा ता. २० एप्रिल रोजीं झाली.

### आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

वरील कंपनीनें १९४६ सालीं ६७ हजारांची विक्री केली व आयुर्वेद महाविद्यालयास मेमोरँडमप्रमाणें १,३७७ रुपयांची देणगी देऊन १,३७७ रु. निवळ नफा मिळविला. भागीदारांना ३½ % डिव्हिडंड मिळणार आहे. कंपनीनें नवीन खरेदी केलेल्या जागेंत इमारतीचें काम सुरू केलें आहे. कंपनीचें भांडवल आणखी ४ लक्ष रुपयांनीं वाढविण्यांत यावयाचें आहे. कंपनीचें वसूल भांडवल ७१ हजार रुपये आहे व तिचेकडे सुमारें ५० हजारांच्या ठेवी आहेत. डॉ. एम. एन. आगाशे हे कंपनीचे चेअरमन असून श्री. रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय आय बी. हे सेक्रेटरी आहेत. कंपनीची वार्षिक सभा ता.२० एप्रिल रोजीं झाली.

**संयुक्त प्रांतांत शेतकऱ्यांच्या कर्जाची चौकशी**—खेडेगांवातील जनतेच्या कर्जाची चौकशी करून तें कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी संयुक्त प्रांत सरकारनें एक कमिटी नेमली आहे. कमिटीचे अध्यक्षपद आचार्य नरेंद्र देव यांना देण्यांत आले आहे.

**सिलोनमधील नारळांच्या बागांची दुर्दशा**—गेल्या वर्षी पडलेल्या अवर्षणामुळें सिलोनमधील नारळांच्या बागांची दुर्दशा उडाली आहे. हजारों नारळाचीं झाडें वठलीं असून शेकडों झाडांना नारळ धरण्याची आशा राहिलेली नाहीं. आलेल्या नारळांपैकींही पन्नास टक्के नारळ गळून पडण्याची भीती वाटत आहे.

## बँकिंगच्या धंद्याची सद्यःस्थिति

**इंडियन ओव्हरसीज बँक लि. मद्रास, चे चेअरमन ना. ।चदंबरम् चेट्टियार ह्यांनीं व्यक्त केलेले विचार.**

( संकलक: श्री. ल. म. जोशी, बी. कॉम., सर्टि. ए. आय. बी. (लंडन); सर्टि. ए. आय. बी. ( मुं. )

१. लढाईच्या काळांत बँकांमधील ठेवींना अगदी भरती आली होती पण १९४६ पासून ती ओसरूं लागली असून लवकरच फुगवटा पूर्ण नाहींसा होईल अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. पण याच काळांत, विशेषतः १९४७ च्या पहिल्या तिमाहींत शेतीकरितां, आयात केलेल्या मालाचे पैसे देण्याकरितां व शेअर्समध्यें व्यवहार करण्याकरितां, बँकांकडून बऱ्याच मोठ्या प्रमाणांत कर्जे घेतलीं गेलीं. याचा परिणाम म्हणजे बजेटची घोषणा झाल्याबरोबर शेअर्सचे भाव गडगडले. आयात केलेल्या मालाच्या किंमती बऱ्याच उतरल्या कारणानें लेटर्स ऑफ क्रेडीट्स वर आणलेला माल बँकांकडे तसाच पडून राहिला; पैसे गुंतले व त्यामुळें कलकत्त्याच्या बऱ्याच बँका बुडल्या.

ढिला कारभार, अशुद्ध पायावर उभारलेलें बँकांचें धोरण, आणि राजकीय व जातीय दंगे यामुळेही कलकत्त्यांतील बऱ्याच बिगर शेड्यूल्ड बँकांवर आपलीं दारें बंद करण्याची पाळी आली. मुंबईस एका बँकेस ठेवी घेण्याची बंदी करण्यांत आली व एकींत कांहीं अव्यवस्था आढळून आल्यामुळें तिला तारणेंही अशक्य होऊन बसलें. लढाईचा भरभराटीचा व चलतीचा काळ संपून अजून पुरें वर्ष, दीड वर्षही झालें नाहीं तोंच असले प्रकार घडावेत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. यास वर नमूद केलेले दोषच प्रामुख्यानें कारणीभूत आहेत व ते टाळण्याकरितां रिझर्व बँकनें कायद्यानेंच सरसकट सर्वच मोठ्या, छोट्या बँकांची नियमित तपासणी करावी. स्वार्थसाधू किंवा मोठें हित असलेल्या लोकांनीं यास किती विरोध केला तरी त्यास भीक घालूं नये. म्हणजे वरील दोष टाळले जाऊन लहान लहान ठेवीदारांच्या हिताचें नीट संरक्षण होईल.

बँकांवर शाखा वाढविण्याबाबतही कडक निर्बंध असला पाहिजे. यावर निर्बंध येणार म्हणून अगोदरच बऱ्याच बँकांनीं आपल्या शाखा—मग तेथील वस्ती, धंदा यास अनुसरून शाखेची जरुरी आहे किंवा नाहीं याचा विचार न करतां—उघडलेल्या आहेत. त्यामुळें मग कायद्याच्या निर्बंधाचा कांहींच उपयोग झाला नाहीं. यामुळें जेथें नको, तेथें खूप बँकांचीं ऑफिसेस झालीं व उगीच स्पर्धा करण्यास जागा झाली. मोठमोठ्या बँका निभावून नेतात; पण लहान बँका तें सर्व टिकवण्याकरितां नियमांस सोडून धोरण आंखतात; कांहीं धाडस करितात; व दुर्दैवानें फासा उलटा पडला म्हणजे सर्वच प्रकरण गळ्याशीं येतें. येवढ्याकरितां अशी स्पर्धा होणार नाहीं इतक्यांनाच शाखा उघडण्याबद्दल परवानगी मिळावी.

---

**तापी व नर्मदा नद्यांना धरणें**—मध्यवर्ती सरकारचे मंत्री. श्री. भाभा यांनीं एका मुलाखतींत असें सांगितलें कीं अमेरिकेंतील 'टी. व्ही. ए.' च्या धर्तीवर तापी व नर्मदा या नद्यांचा उपयोग करून घेण्याच्या योजनेला मध्यवर्ती सरकार मुंबई सरकारच्या मदतीनें लवकरच हात घालणार आहे. या योजनेमुळें नवे उद्योगधंदे, वीज-निर्मिति केंद्रें, पुराचें नियंत्रण व आधुनिक शेती इत्यादि फायदे होतील असें मत त्यांनीं व्यक्त केलें.


**दि रत्नाकर बँक लिमिटेड.**

ऑफिसें:—१ कोल्हापूर, २ शाहुपुरी, ३ सांगली, ४ मिरज, ५ जयसिंगपूर.

चेअरमनः—नामदार बी. बी. पाटील, बी. ए., एलएल. बी. डेव्हलपमेंट मिनिस्टर, सांगली स्टेट.

| | रु. |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | १०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ३,१३,६०० |
| खेळतें भांडवल अंदाजें | ३५,००,००० |

—: अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात. :—

**दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

**विजय टेक्स्टाइल्स लि.**

—येरंडवणा पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंटस्.

# हिंदुस्थानच्या स्टर्लिंग कर्जाच्या परतफेडीबद्दल इंग्लंडचें धोरण

लेखकः—श्री. भास्कर महादेव काळे, एम्. ए., बी. टी.

महायुद्ध सुरू झाल्यावर इंग्लंडनें युद्धकार्यासाठीं हरतऱ्हेची मोठ्या प्रमाणांत जी खरेदी केली त्यामुळें इंग्लंड हिंदुस्थानचें फार मोठें देणेकरी बनलें आहे. कारण हिंदी मालाचे पैसे किंवा मूल्य नेहमींच्या व्यापारी पद्धतीनें न देतां, इंग्लंडनें हिंदुस्थानच्या नांवानें तेवढ्या रकमा, पौंड स्टर्लिंगमध्यें लंडन येथें खातेबुकांत जमा केल्या, व ह्या स्टर्लिंगच्या तारणावर रिझर्व्ह बँकेला नोटा काढण्याचा अधिकार प्राप्त झाला, यामुळें हिंदुस्थानांत चलनविस्तार होऊन महागाई झाली. इंग्लंडच्या हिंदुस्थानवरील राजकीय वर्चस्वामुळेंच ह्या गोष्टी होऊं शकल्या. वास्तविक आर्थिक दृष्ट्या हिंदुस्थान इतका दरिद्री आहे व येथील उत्पादन इतकें कमी आहे कीं हरतऱ्हेचें जीवनविषयक व लष्करी साहित्य स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन, नाइलाज म्हणून हिंदुस्थाननें इंग्लंडला पुरविलें. अहोरात्र श्रम करून व रक्त आटवून हें साहित्य हिंदी मजूर व शेतकरी ह्यांनीं इंग्लंडला अगदीं निकडीच्या वेळीं पुरविलें आहे. ह्याची जाणीव आपल्या पुढाऱ्यांना असल्यामुळेंच, स्टर्लिंग बॅलन्सचें वर्णन करतांना, स्टर्लिंग बॅलन्स हें हिंदी मजूर व शेतकरी ह्यांच्या रक्ताचा परिपाक आहे अशी भाषा गेलीं चार वर्षें निरनिराळ्या प्रसंगीं बोलतांना त्यांनीं वापरली आहे. हिंदी स्टर्लिंग कर्ज हें गरीब हिंदी जनतेच्या स्वार्थत्यागाचें फळ आहे, व हा स्वार्थत्याग अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगीं हिंदी जनतेनें इंग्लंडच्या फायद्यासाठीं केला असल्यामुळें, हिंदी स्टर्लिंग कर्जाची पूर्णपणें फेड केली जाईल असें आश्वासन सुप्रसिद्ध इंग्लिश अर्थशास्त्रज्ञ कै. लॉर्ड कीन्स ह्यांनीं १९४४ सालीं इंग्लंडतर्फे दिलें होतें. महायुद्ध संपेपर्यंत स्टर्लिंग कर्जाच्या परतफेडीबद्दल इंग्लंडकडून किंवा इंग्लंडच्या हिंदुस्थानांतील जबाबदार अधिकाऱ्यांकडून कोणतेंहि संशयास्पद विधान केलें गेलें नाहीं. व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल ह्यांनीं १९४४ मध्यें कलकत्ता येथें असोसिएटेड चेंबर ऑफ कॉमर्सपुढें बोलतांना स्टर्लिंग कर्जाची इंग्लंडकडून परतफेड होईल असें सांगितलें. त्याचप्रमाणें १९४५ सालीं व १९४६ सालीं बजेटवरील भाषणांत अर्थमंत्री सर जेरेमी रेसमन व सर आर्चिबाल्ड रोलँड्स ह्यांनीं स्टर्लिंग कर्जाची परतफेड योग्य वेळीं पूर्णत्वानें होईल अशीं आश्वासनें दिलीं.

हिंदुस्थानच्या स्टर्लिंग कर्जानें एप्रिल १९४६ मध्यें १,७३० कोटी रुपये हा उच्चांक गांठला. युद्धोपयोगी विक्री मालाच्या रूपानें हें कर्ज इंग्लंडला देऊन हिंदुस्थाननें पदरांत महागाई आढवून घेतली. अन्नाची व कापडाची टंचाई, घरें बांधण्याच्या साहित्याची टंचाई इ. गोष्टी हिंदी जनतेला सहन कराव्या लागल्या. १९४३ चा सुप्रसिद्ध बंगालचा दुष्काळ, कीं ज्यांत २० ते ३० लक्ष माणसें मृत्युमुखीं पडलीं, ह्यांतूनच उद्भवला. वांटपपद्धति सुरू करावी लागली. एखाद्या श्रीमंतानें दुसऱ्याला कर्ज देणें साहजिक असतें. परंतु हिंदुस्थानची स्थिति श्रीमंतीची नव्हती. हिंदी जनतेच्या पाशीं विक्रीमाल पडून राहिलेला नव्हता. तर स्वतःची गैरसोय करून हिंदुस्थाननें इंग्लंडची सोय पाहिली, व महागाई आणि इतर आपत्ति आपल्यावर ओढवून घेतल्या.

हिंदी औद्योगिक पुढाऱ्यांची व अर्थशास्त्रज्ञांची अशी साहजिक अपेक्षा होती कीं युद्ध संपल्यावर इंग्लंडकडून स्टर्लिंग कर्जाची परतफेड होईल व, तिचा विशेष तऱ्हेनें उपयोग, भांडवली मालाच्या खरेदीसाठीं, व इतर तऱ्हेनें युद्धोत्तर पुनर्घटनेच्या रचनात्मक कार्यक्रमांत हिंदुस्थानला होईल. टाटा—बिर्ला योजना किंवा इतर पुनर्घटनेच्या योजना कांहींशा ह्या अपेक्षेवर आंखलेल्या होत्या.

परंतु स्टर्लिंग कर्जाच्या परतफेडीबद्दल महायुद्ध संपल्यानंतर इंग्लंडचें धोरण संशयास्पद बनत चाललें. त्याला मूळ कारण म्हणजे १९४५ डिसेंबरमध्यें अमेरिकेनें इंग्लंडला आर्थिक पुनर्घटना करण्यासाठी दिलेलें प्रचंड कर्ज होय. ह्या कर्जाच्या वेळीं अमेरिकेनें इंग्लंडवर अशी एक अट घातली होती कीं: हिंदुस्थान इ. देशांचें देणें असलेलें स्टर्लिंग कर्ज इंग्लंडनें कमी रकमेवर तोडून फेडावें. अलीकडे अमेरिकन वृत्तपत्रांतून इंग्लंडनें हिंदुस्थानचें कर्ज शक्य तर अजिबात परत करूं नये असाहि प्रचार केला जातो. चर्चिलकडून असें प्रतिपादलें जातें कीं, ऐन प्रसंगीं इंग्लंडनें जपानपासून हिंदुस्थानला वांचविल्यामुळें त्याचा मोबदला म्हणून स्टर्लिंग कर्ज अजिबात रद्द करावें. आणखी चर्चिल असेंहि म्हणतो कीं, हिंदुस्थानांतून भरमसाट किंमतीनें माल खरेदी केला गेला. चर्चिलचीं हीं दोनही विधानें पर्णपणें खोटीं आहेत; कारण हिंदुस्थानांतून खरेदी योग्य बाजारभावानेंच करण्यांत आली असा निर्णय खुद्द पार्लमेंटरी कमिटीनेंच कांहीं काळापूर्वी दिला आहे; व इंग्लंडनें हिंदुस्थानशीं करार केल्याप्रमाणें हिंदुस्थाननें युद्ध-काळांत व मार्च १९४७ पर्यंतहि, सर्व जादा लष्करी खर्च सोसला. हा जादा लष्करी खर्च, १९३९ च्या लष्करी खर्चाच्या आठ पटींपेक्षांहि एका वर्षी जास्त होता.

स्टर्लिंग कर्जाच्या परतफेडीबद्दल प्राथमिक स्वरूपाची चर्चा करण्याकरितां इंग्लंडच्या अर्थ—खात्यातर्फे एक शिष्टमंडळ हिंदुस्थानांत फेब्रुवारी महिन्यांत येऊन गेलें. परंतु त्यांतून कांहीं निष्पन्न झालेलें नाहीं.परंतु अर्थ—मंत्री मि. लियाकत अल्ली हे अनेक मुत्सद्यांबरोबर ह्याच प्रश्नाची वाटाघाट करण्यासाठी लौकरच इंग्लंडला जाणार आहेत. अर्थमंत्र्यांच्या बजेटावरील भाषणांवरून स्टर्लिंग कर्जाच्या परत फेडीबद्दलची त्यांची कळकळ स्पष्ट होते. इतर प्रसंगींहि ह्या बाबतींत हिंदुस्थानचें अंतिम हित आपण साध्य करण्याचा प्रयत्न करूं अशा आशयाचीं आश्वासनें त्यांनीं दिलीं आहेत. तेव्हां सध्यां तरी अजून कांहीं आशा करावयास जागा आहे असें वाटतें.

स्टर्लिंग कर्जाच्या परतफेडीबद्दलच्या ह्या टोलवाटोलवीवरून इंग्लंड व अमेरिका ह्या जागतिक अर्थव्यवस्थेच्या अग्रभागीं असणाऱ्या राष्ट्रांची मनोवृत्ति स्पष्ट होते, व त्यापासून भावी आर्थिक हितसंबंधांच्या बाबतींत हिंदुस्थाननें शिकण्यासारखें पुष्कळ आहे. जगांतील राहाणीचें मान सुधारावें व परराष्ट्रीय व्यापार वाढावा असें प्रतिपादणाऱ्या संपत्तीच्या शिखरावर लोळणाऱ्या अमेरिकेनें, हिंदी जनतेचें कर्ज तोडलें जावें असें प्रतिपादावें हें काय दर्शवितें बरें ? हिंदुस्थानचें स्टर्लिंग कर्ज हें वास्तविक पवित्र ठेव म्हणून समजून, इंग्लंडनें तें परत केलें पाहिजे. अतिशय गरीब जनतेनें स्वतःवर संकटें ओढवून इंग्लंडला ऐनप्रसंगीं कर्ज दिलें तर आतां इंग्लंडनें असें दिरंगाईनें व संशयास्पद टोलवाटोलवीचें धोरण स्वीकारावें हें कोणत्या नीतिशास्त्राला धरून आहे? इंग्लंडचें राहाणीचें मान कमीत कमी हिंदुस्थानच्या अकरा पट आहे. इंग्लंड मनांत आणील तर हिंदुस्थानचें कर्ज, कांहीं थोड्या वर्षांत भांडवली मालाच्या रूपानें व इतर प्रकारें इंग्लंडला परत करतां येईल. इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या प्रेरणेनें महायुद्धानंतर निरनिराळ्या चार पांच आंतरराष्ट्रीय संस्था जगदोद्धारासाठीं स्थापन झाल्या आहेत. ह्या संस्थांच्या अंतिम हेतूंबद्दल, स्टर्लिंग कर्जाच्या परतफेडीबद्दलच्या धोरणावरून, संशय येतो.

# पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८१ | " Cencobank " | नं. ११ |

**मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

**जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर**

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

**द. दि. चितळे**
मॅनेजिंग डायरेक्टर



कंपनीच्या पहिल्याच वर्षींच्या कंसगाळणीस सुरुवात होऊन अद्यावत् पद्धतीचा एकजिनसी गूळ तयार होऊं लागला.

# पांडुरंग ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस लिमिटेड

रजिस्टर्ड ऑफिस व फॅक्टरी : पोस्ट–कुरोली, ( जि. सोलापूर )

अधिकृत भांडवल : रु. १०,००००० ( दहा लाख )
विक्रीस काढलेलें भांडवल : रु. ५,००००० ( पांच लाख )

पुढीलप्रमाणें—१०००—५ टक्के क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स प्रत्येकी रु. १०० चा. ६००० "बी" क्लास ऑर्डिनरी शेअर्स, प्रत्येकी रु. ५० चा. १०००० "सी" क्लास ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येक रु. १० चा ( "सी" क्लासचे सर्व शेअर्स खपले आहेत. )

**—शेअर्सची विक्री चालू आहे—**

त्याच्या रकमा पुढीलप्रमाणें भरावयाच्या आहेत.

अर्जासोबत शेअर्सच्या ¼ व अर्जमंजुरीनंतर ¼ व उरलेली रक्कम प्रत्येक कॉलमध्यें तीन महिन्यांपेक्षा कमी अंतर नसलेल्या दोन हप्त्यांनीं.

★ कंपनीस मिरज ( ज्यु. ) दरबारनें १५ वर्षें इन्कमटॅक्स माफ केला आहे व इतर सवलती देऊन रु. २५,००० चे शेअर्स घेतले आहेत.

★ पहिल्याच वर्षी कंपनी १० टक्के डिव्हिडंड देण्याची हमी घेत आहे.

शेअर–फॉर्म, माहितीपत्रकें याकरितां वरील पत्त्यावर लिहा.

मॅनेजिंग एजन्टस् : जे. व्ही. ताम्हनकर आणि कंपनी.

इन्फर्मेशन ऑफिसेस :

पुणें–लक्ष्मी रोड, गणपति चौक, बुधवार, नं. ६२, पुणें २.
पंढरपूर—नवी पेठ, पंढरपूर.



गेल्या वर्षांतील स्पृहणीय यश—
हाच नव्या वर्षाचे कार्याला सुमुहूर्त—

# दि सुप्रीम म्यूच्युअल विमा कंपनी लि. पुणें २.


| | | रुपये |
|---|---|---|
| आलेलें काम | : : | २७,२९,२५० |
| स्वीकृत काम | : : | २५,४४,७५० |
| पूर्ण काम | : : | २२,६३,००० |

अल्पावधींत मिळविलेल्या यशाची वरील आंकडेच ग्वाही देतील.

—एजन्सीसाठीं व विम्यासाठीं चौकशी करा—

व. ने. म्हैसूर,
मॅनेजर





**अधिक धान्य पिकविण्याची योजना**

—यशस्वी होण्यास—

# किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

## मुंबई शेअर बाजार

व्याज-वजा

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून ) स्वदेशी रु. २७ दि. २८।५।४७

सातात्हिक बंद भाव

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार ६।५।४७ | बुधवार ७।५।४७ | गुरुवार ८।५।४७ | शुक्रवार ९।५।४७ | सोमवार १२।५।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २११७-८; २०२७-८ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | २११५ | २१६० | २१४५ | २१३६—४ | २०५० |
| ६३८; ४५७-८ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४०१ | ४०८ | ४०४ | ४०३ | ३८६ |
| ६५; ३६-४ | ०-८-०S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | २६ | २६-११ | २६-१२ | २६—८ | २५-१४ |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ३३-१५ | ३४-१२ | ३४-१० | ३४—८ | ३३-१० |
| | 'बोनस शेअर' | | | | | | | | |
| ३२७७-८; २१३२-८ | ४०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १०४७—८ | १०७० | १०७१—४ | १०७५ | १०४५—० |
| ११८०; ६५८ | १३-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६७३ | ६८९ | ६८६ | ६८५ | ६६८—० |
| ९९९; ६६० | २७-०-० | मे | स्वदेशी | १०० | ६१५ | ६२२ | ६१८ | ६१८ | ६०० |
| ५६७; ३९८ | २-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | २७८ | २७९ | २७९ | २७९ | २७४—८ |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ३११ | ३१४ | ३१० | ३०९ | ३०५ |
| ५७१; ३२३ | १२-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३०१—८ | ३०६ | ३०३ | ३०३ | २९५ |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३२५ | ३३० | ३२४ | ३२१ | ३०६ |
| ७-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४—५ | ४—५ | ४—४—६ | ४—४—६ | ४—४ |
| २९-१; १६-१२ | ०-१३-९ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १५-१२ | १५-१४ | १५-१२ | १५-१० | १५—६ |
| ६-११-६; ३-३-६ | ०-२-६ | मे | ,, डिफर्ड्स | १ | ३—३—६ | ३—४ | ३—३—६ | ३—३ | ३—२ |
| १०९२-८; ७३५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ५७० | ५८० | ५७० | ५७० | ५२७—८ |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | १७६ | १७८ | १७७—८ | १७८ | १७५ |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २६० | २६२ | २५९ | २५७—८ | २५२ |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ४५३-१२ | ४५८-१२ | ४५७—८ | ४५६—४ | ४५२—८ |
| ६०-१० ३६-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३१—९ | ३१-१२ | ३१-८ | ३१—७ | ३१—० |

सोमवार दि. १२-५-४७ चे भाव

| बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|
| बरोडा | १६६ | आंध्र व्हॅली | १५६५ | अल्कॉक | ५५० |
| सेंट्रल | १०३ | बॉम्बे ट्रॅम | ११७ | न्यू इंडिया | ८२ |
| इंडिया | २४१ | टाटा हायड्रो | १७६ | शिवराजपुर | ३६—८ |
| इंपी० | २३९५ | टाटा पॉवर | १६९० | टाटा केमिकल | १६—४ |
| | ५९० | | | टाटा ऑईल | ७७—८ |
| रिझर्व्ह | ११८ | | | विमको | २७३-१२ |

**अमेरिकन शेतीचा अभ्यास**—अमेरिकेंतील शेत-जमीन सुधारण्याच्या व इतर शेती-विषयक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें एक अभ्यास मंडळ अमेरिकेला पाठविलें आहे. मंडळांत डॉ. सेन व डॉ. रे असे दोन बंगाली समासद आहेत.

**मुंबई-कराची रेल्वे रस्ता**—मुंबई ते कराची यांना सरळ जोडणाऱ्या रेल्वे-रस्त्याची प्राथमिक पहाणी आतां पुरी झाली असून संकल्पित योजनेचा रेल्वे-बोर्ड विचार करीत आहे. हा रस्ता विरमगाव, बदीन, हैद्राबाद, कराची या शहरांच्या अनुरोधानें होईल असें वाटतें. या मार्गाऐवजी कच्छ संस्थानांतूनही एक मार्ग काढता येइल, पण तो ३ कोटी रुपयांनीं अधिक खर्चाचा होईल.

**न्यूयॉर्क येथें हिंस्त्र श्वापदांचा पुण्याचा शिक्षक**—न्यूयॉर्क-मधील मॅडिसन स्क्वेअर गार्डनमधील सर्कशींत श्री. दामोदरपंत घोत्रे नांवाचे एक पुण्यांतील हिंस्त्र श्वापदांना शिकविणारे गृहस्थ आहेत. एक केरसोणी बांधलेली काठी आणि चाबूक यांच्या साह्यानें काळे-पिवळे चित्ते आणि इतर क्रूर श्वापदांकडून ते कामें करवून घेतात. न्यूयॉर्कमधील सर्कशीचे प्रेक्षक श्री. घोत्रे यांना शाबासकी देतात.


शाळाखात्याची मान्यता मिळालेलें

**पूना कमर्शिअल हायस्कूल**

एस. एल. सी. परीक्षेचा कोर्स, जमाखर्च, टाईपरायटिंग, शॉर्टहँड इत्यादि विषय. इंग्रजी ३ री व ४ थी पास झालेल्या विद्यार्थ्यांस अनुक्रमें ४ थी व ५ वीमध्यें प्रवेश. होतकरू व गरीब विद्यार्थ्यांसाठीं शिष्यवृत्त्या आहेत. वर्ग जूनपासून सुरू.

मुख्याध्यापक

पत्ताः—२५७ क, बुधवार पेठ, फरासखान्याच्या हौदासमोर, पुणें २



**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर ( जि. नाशिक ), खोपोली पे ऑफिसः

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९६,२४५ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५५ लाखांचेवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का कर-माफ डिव्हिडंड दिलें.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

अधिकृत व विक्रीस

| | | |
|---|---|---|
| काढलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | ,, | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ,, | ६,७७,३७० |
| एकूण खेळतें भांडवल | ,, | ५८,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्टस् दिले जातात.


शेअर सर्टिफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. श्री. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी.,
मॅनेजर

चिं. त्रिंबक चितळे
मॅ. डायरेक्टर





## पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

## साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

**व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी**


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि यर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२१ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.